**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय, चांदवड (नाशिक )**

**-जाहिर नोटीस-**

दिनांक : २८/०२/२०२५

१. तमाम जनतेस याव्दारे कळविण्यांत येते की, चांदवड येथील न्यायालयाच्या इमारतीसाठी संपादीत केलेल्या गट नं. ७१० पैकी १ हेक्टर ७५ आर जागेमध्ये असलेल्या चिंचेच्या झाडांना आलेल्या फळबहारांचा जाहिर लिलाव **दिनांक १८ माहे मार्च २०२५ रोजी दुपारी २:०० वाजता दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदवड** येथे करण्यांत येणार आहे. या लिलावात जास्तीत जास्त बोली बोलणा-या व्यक्तीस सदर चिंचेच्या फळांची विक्री केली जाईल.

२. सबब ज्यांना सदर लिलावात भाग घ्यावयाचा असेल त्यांनी उपरोक्त नमुद तारखेस, वेळेस व ठिकाणी उपस्थित राहून भाग घ्यावा. लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

**लिलावाच्या अटी व शर्ती**

१. सदर चिंचेचा फळबहार हा चिंचेच्या झाडावर पहावयास मिळतील.

२. लिलाव घेणा-या व्यक्तीस त्याच दिवशी सर्व पैसे जे लिलावात बोली केली असेल ती एकरकमी भरावी लागेल. त्याची रितसर सरकारी पावती मिळेल.

३. सदर लिलावात तीन वार बोलीनंतर आलेले व नंतर बोली केलेली स्विकारली जाणार नाही.

४. लिलाव स्विकारणा-या व्यक्तीने झाडावरुन चिंचेचा फळ बहार उतरवितांना झाडाचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. लिलाव स्विकारणा-या व्यक्तीने झाडावरुन चिंचेचा फळबाहार स्वखर्चाने उतरवावा.

६. झाडावर चढतांना व उतरतांना अथवा चिंचेचा फळ बहार उतरवतांना अपघात झाल्यास न्यायालय जबाबदार राहणार नाही. सर्वस्वी जबाबदारी लिलाव घेणा-या व्यक्तीची राहील याची नोंद घ्यावी.

७. लिलावात बोली बोललेली रक्कम स्विकारणे किंवा रद्द करणे याचे अधिकार राखुन ठेवण्यांत आलेले आहेत.

(सही) २८/२/२५

(पी.बी.जोशी)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व
न्यायदंडाधिकारी, वर्ग - १,
चांदवड

दि. २८/२/२०२५

प्रत,

१.मा. तहसिलदार साहेब, चांदवड
२.मा. मुख्याधिकारी साहेब, चांदवड नगरपरिषद, चांदवड
३. मा. उपविभागीय अधिकारी, चांदवड
४. मा.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चांदवड
५. मा. न्यायालयाचे नोटीसबोर्डवर प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर -**

आदरणीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, नाशिक

आपला विश्वासू,

(सही) २८/२/२५

(पी.बी.जोशी)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व
न्यायदंडाधिकारी, वर्ग - १,
चांदवड

जा.क्र 847 /२०२५
दिनांक : २८/०२/२०२५
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदवड